Sakal, "Today" 7th March 2010 Page No. 11

# 'संस्कारातून अंतरंगातील नीतिमत्ता जपावी'

## 'व्यावसायिक नीतिमत्ता'विषयक अहवालाचे अभय फिरोदियांच्या हस्ते प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ६ : "आपला समाज बदलाच्या युगातून जात असून, आधुनिकीकरणापासून आपल्याला दूर ठेवणे अवघड आहे. अशा परिस्थितीत आपल्यामध्ये संस्कारातून अंतरंगामध्ये असलेल्या नीतिमत्तेला जपणे महत्त्वाचे आहे," असे मत प्रसिद्ध उद्योगपती अभय फिरोदिया यांनी शुक्रवारी व्यक्त केले. 'इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' आणि 'एस. जी. बापट असोसिएट्स'तर्फे 'व्यावसायिक नीतिमत्ता-सद्यःस्थिती' या अहवालाचे प्रकाशन फिरोदिया यांच्या हस्ते झाले. संस्थेच्या अध्यक्षा तरिता शंकर, कार्यकारी संचालिका डॉ. प्राची जावडेकर आणि डॉ. एस. जी. बापट या वेळी उपस्थित होते.



मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, टिळक रस्ता : इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि एस. जी. बापट असोसिएट्सतर्फे 'व्यावसायिक नीतिमत्ता : सद्यःस्थिती' या अहवालाचे प्रकाशन अभय फिरोदिया यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी (डावीकडून) डॉ. एस. जी. बापट, तरिता शंकर, फिरोदिया, डॉ. प्राची जावडेकर

फिरोदिया म्हणाले, "सत्य, नीती याची व्याख्या करता येत नाही. या संकल्पनांचा केवळ अन्वयार्थ लावता येतो. रीतीला परंपरेचे, तर नीतीला मूल्यांचे अधिष्ठान असते. एखाद्याच्या परिप्रेक्ष्यातून नैतिक असलेली बाब दुसऱ्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून अनैतिक असू शकते. राजकीय नेतृत्व देशहिताचा विचार न करता केवळ स्वार्थाचा विचार करीत आहे. राजकारण, प्रशासन आणि पोलिस हे भ्रष्ट व्यवस्थेमध्येच काम करीत आहे. देशातील वाघांची संख्या सांगता येते; पण प्रामाणिक पोलिसांची संख्या किती, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. नैतिक आचाराची व्याख्या स्पष्टपणे सांगता येत नाही." या वेळी तरिता शंकर, जावडेकर आणि बापट यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. श्रीराम नेर्लेकर यांनी सूत्रसंचालन केले.